# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:23.05.2025** **वार:शुक्रवार**

1. देशातील रेल्वे स्थानकांचं आधुनिकीकरण हे 'विकास आणि वारसा' यांचं उत्तम उदाहरण असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.
2. देशभरातील 103 अमृत रेल्वे स्थानकांचं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन, राज्यातल्या 15 रेल्वे स्थानकांचा समावेश
3. ऑपरेशन सिंदूरबाबत भारताची भूमिका मांडण्यासाठी शिष्टमंडळं विविध देशात रवाना
4. केंद्र सरकारकडून तूर खरेदीला येत्या 28 मेपर्यंत मुदतवाढ
5. माथेरान इथं ड्रोनच्या साहाय्यानं टपाल सेवा पुरवण्याचा प्रयोग यशस्वी आणि
6. राज्यात ठिकठिकाणी पावसाने पिकांचं मोठं नुकसान; कोकण आणि मध्य महाराष्ट्रात आजही मुसळधार पावसाचा इशारा

**अमृत स्थानक मोदी-राजस्थान**

देशात पायाभूत सुविधांचा वेगाने विकास सुरू असून रेल्वे स्थानकांचं आधुनिकतेकडे होणारं परिवर्तन हे विकास आणि वारसा यांचं उत्तम उदाहरण असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पंतप्रधानांच्या हस्ते काल राजस्थानमधील बिकानेर इथून दूरस्थ पद्धतीने देशभरातील 103 पुनर्विकसित अमृत स्थानकांचं लोकार्पण करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते. ही अमृत भारत स्थानकं केवळ भारताच्या हजारो वर्षांच्या जुन्या वारशाचं जतन करत नाहीत; तर पर्यटनवाढीसाठीही काम करत असल्याचं मोदी म्हणाले...

**आज देश में आधुनिक इंफ्रास्ट्रक्चर बनाने का बहुत बड़ा महायज्ञ चल रहा है। हमारे देश की सड़कें आधुनिक हो, हमारे देश के एयरपोर्ट आधुनिक हो। हमारे यहां रेल और रेलवे स्टेशन आधुनिक हो। इसके लिए पिछले ग्यारह साल में अभूतपूर्व गति से काम किया गया है। आप कल्पना कर सकते हैं। इंफ्रास्ट्रक्चर के इन कामों पर देश पहले जितना पैसा खर्च करता था, आज उससे छह गुना ज्यादा पैसा खर्च कर रहा है। छह गुना ज्यादा आज भारत में हो रहे इन विकास कार्यों को देखकर दुनिया भी हैरान है। आज भारत अपनी ट्रेनों के नेटवर्क को भी आधुनिक कर रहा है।**

यावेळी केलेल्या भाषणात मोदी यांनी दहशतवादाविरोधातील भारताची भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित केली. ऑपरेशन सिंदूर हे न्यायाचं रूप असल्याचं मोदी म्हणाले. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, राज्यपाल हरिभाऊ बागडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

राज्यातील 15 रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास पूर्ण झाला असून त्यांचंही लोकार्पणही काल करण्यात आलं. मुंबईतल्या परळ इथल्या स्थानकाच्या लोकार्पण कार्यक्रमात राज्यपाल सी पी राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. विमानतळांच्या धर्तीवर सर्व रेल्वे स्थानकांचा विकास करण्यात येत असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.....

**देशामध्ये मोदी सरकार आल्यानंतर रेल्वे विभागाचा कायापालट चालू झाला वंदे भारत ट्रेन नवो भारत ट्रेन अमृत भारत ट्रेन्सनी परदेशातल्या ट्रेन्सची अनुभूती सामान्य भारतीयांना दिली, आणि भारतातही अतिशय स्वच्छ आणि वेगवान ट्रेन चालू शकते, हे मोदीजींनी दाखवून दिलं आपल्या सबर्बन रेल्वेचे स्टेशन्स त्यावर एलेटर लावणं असेल पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असतील स्वच्छतेच्या व्यवस्था असतील इतक्या मोठ्या प्रमाणात इन्फ्रास्ट्रक्चरचं काम सामान्य**

**भारतीयांकरता मोदीजींच्या माध्यमातून झालं आहे, आणि आपली रेल्वे ही जगातल्या आधुनिकतम रेल्वेमध्ये आता सामील होते आहे.**

**<u>शौर्य पुरस्कार</u>**

नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात काल झालेल्या सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते शौर्य पुरस्कार प्रदान करण्यात आले. पहिल्या टप्प्यात सैन्य दलं, केंद्रीय तसंच राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या पोलिस दलातील कर्मचाऱ्यांना काल पुरस्कार प्रदान करण्यात आले. या पुरस्कारांमध्ये सहा कीर्तीचक्र आणि 33 शौर्यचक्रांचा समावेश आहे. त्यातील चार कीर्तीचक्र आणि सात शौर्यचक्रं मरणोत्तर देण्यात आली आहेत.

**<u>शिष्टमंडळ</u>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, सात बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळं येत्या 15 दिवसांत 32 वेगवेगळ्या देशांना भेटी देणार आहेत. खासदार संजय कुमार झा यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ जपानमध्ये, तर खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळ संयुक्त अरब अमिरातीत दाखल झालं आहे; काल त्यांनी तिथल्या मंत्र्यांची भेट घेऊन चर्चा केली. खासदार कनिमोळी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ स्पेन, ग्रीस, स्लोव्हेनिया, लाटविया आणि रशिया या पाच देशांच्या दौऱ्यावर रवाना झालं आहे. अन्य चार शिष्टमंडळं येत्या काही दिवसांत वेगवेगळ्या देशांना रवाना होणार आहेत.

**<u>तिरंगायात्रा-सिंधुदुर्ग</u>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ काल सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडीमध्ये तिरंगा यात्रा काढण्यात आली. भर पावसात नागरिक मोठ्या संख्येने या यात्रेत सहभागी झाले होते. कॉंग्रेस पक्षाच्या वतीनं देखील राज्यात ठिकठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात आली. रत्नागिरी इथल्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका पूजा कात्रे यांनी ऑपरेशन सिंदूरबाबत आपल्या भावना आकाशवाणीकडे व्यक्त केल्या.....

**भारतीय सैन्याचा हा फलातून बुद्धिबळाचा डाव होता ऑपरेशन शब्दात देशाची रणनीती होती तर सिंदूर शब्दात देशवासियांच्या भावनांचे हुंकार होते या मिशनच्या नावात पावित्र्य आहे भावनिक हेतू दडलेला आहे त्या नावाला बलिदानाचा रंगसुद्धा आहे. आणि जिथून पुढे गेलात तिथं भारताची अस्मिता रक्तरंजित होऊनच उत्तर देईल असा भारताने पाकिस्तानला दिलेला स्पष्ट इशारा आणि सज्जड दवमे कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग धैर्य आणि प्रगतीचे प्रतीक असणाऱ्या या आर्या आणि दुर्गा यांचंही या मिशनमधील योगदान आम्हा भारतीयांच्या दृष्टीने अत्यंत अभिमानाची बाब आहे.**

**<u>तूर</u>**

केंद्रीय कृषी मंत्रालयाने तूर खरेदीला येत्या 28 मेपर्यंत मुदतवाढ दिली आहे. यामुळे राज्यातील तूर उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असल्याचं पणनमंत्री जयकुमार रावल यांनी म्हटलं आहे. राज्यात तूर खरेदीची मुदत 13 मे पर्यंत देण्यात आली होती. मात्र तूर उत्पादक शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेऊन ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

**<u>ड्रोन टपाल-रायगड</u>**

रायगड जिल्हयातील माथेरान इथं ड्रोनच्या साहाय्यानं टपाल सेवा पुरवण्याचा प्रयोग नुकताच यशस्वी करण्यात आला. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**समुद्र सपाटी पासून 800 मिटर उंचीवर असलेल्या माथेरानला ड्रोनच्या साहाय्यानं टपाल सेवा पुरविली जाणार आहे. ड्रोनच्या मदतीने दुर्गम भागात सेवा पुरविली जाणार आहे. देशात असा प्रयोग प्रथमच माथेरानमध्ये केला जाणार आहे. 16 मे रोजी या ड्रोन सेवेची यशस्वी चाचणी केली गेली. कर्जत येथील पोस्टाच्या इमारतीवरून ड्रोन उडाले आणि ते**

**9.8 किलोचे वजन घेऊन अवघ्या 15 मिनिटात माथेरानला पोहोचले. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी रायगडहून शोभना देशमुख.** **आकाशवाणीच्या बातम्यांसाठी रायगडहून शोभना देशमुख**.

**वीरमरण-अहिल्यानगर**

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा गावाचे जवान संदीप गायकर यांना जम्मू-काश्मीरमध्ये कर्तव्य बजावताना वीरमरण प्राप्त झालं. त्यांच्या पार्थिव देहावर आज त्यांच्या मूळ गावी अंत्यस्कार केले जाणार आहेत.

**निधन**

पुण्यातील ज्येष्ठ प्रवचनकार आणि पावसच्या स्वामी स्वरूपानंदांच्या शिष्या योगिनीताई ताडे यांच काल रात्री पुण्यात अल्पशा आजाराने निधन झाल. त्या 85 वर्षांच्या होत्या. 60 वर्षांहून अधिक काळ त्यांनी प्रवचनाद्वारे आध्यात्मिक प्रबोधनाचं कार्य केलं. आज सकाळी वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**निधन**

जैन साध्वी डॉक्टर प्रियदर्शनाजी गुरु महाराज यांची संथारा व्रत पूर्णाहुति काल पुण्यात झाली. त्यांचं समाधी पूर्व संलेखना व्रत 68 दिवसापर्यंत चालले. त्यांचं पार्थिव दर्शनासाठी कोथरूडमधील वर्धमान सांस्कृतिक प्रतिष्ठान इथं ठेवण्यात आलं आहे. आज सकाळी वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जातील.

**खेलो इंडिया**

दीवच्या घोघला समुद्र किनाऱ्यावर सुरू असलेल्या खेलो इंडिया बीच स्पर्धेत 4 सुवर्ण, 4 रौप्य आणि 6 कास्य पदकांसह 14 पदकांची लयलूट करत महाराष्ट्राने प्रथम स्थानावर झेप घेतली आहे. कालच्या तिसऱ्या दिवशी 50 ते 55 किलो वजनी गटात जयश्री शेटे हिने सुवर्ण कामगिरी केली. रामचंद्र बदक आणि सचिन गर्जे, ओंकार अभंग, वैभव काळे आणि अंशुल कांबळे यांनी आपापल्या गटात रौप्य पदकं पटकावली. कबड्डीमध्ये महिला गटात महाराष्ट्राने उपांत्य फेरीत प्रवेश केला.

**क्रिकेट**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेमध्ये काल लखनौ सुपर जायंट्स संघाने गुजरात टायटन्सचा 33 धावांनी पराभव केला. लखनौने मिचेल मार्शच्या शतकाच्या जोरावर 235 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल गुजरात संघ 202 धावा करू शकला.

**पाऊस**

राज्याच्या विविध भागात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या पावसामुळे शेतपिकांचं नुकसान झालं आहे. लातूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी ज्वारी, बाजरी आडवी झाली असून निलंगा तालुक्यात टरबुजाची शेती उद्ध्वस्त झाली आहे. रत्नागिरी जिल्ह्यात काल सलग तिसऱ्या दिवशी पावसाची संततधार सुरू होती. या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात वादळी पावसामुळे अनेक ठिकाणी घरं आणि गोठ्यांची पडझड झाली आहे. दोडामार्ग तालुक्यात एकाचा वीज अंगावर पडून मृत्यू झाला. बुलढाणा जिल्ह्यातही पावसामुळे शेतपिकांचं मोठं नुकसान झालं असून वीज कोसळून अनेक जनावरे दगावली आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातही पावसाचा जोर कायम आहे.

**हवामान**

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात आजही वादळी वाऱ्यासह पावसाचा जोर कायम राहील, राज्याच्या अन्य भागातही तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.